| | |
|---|---|
| दाखल तारीख | १२/०२/२०१८. |
| फैसला तारीख | १२/०२/२०१८. |
| निकाल तारीख | १२/०२/२०१८. |
| कालावधी | ०० वर्ष ०० महिने ०० दिवस |

# सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापुर विभाग, सोलापुर यांचेसमोर

## बदल अर्ज क्र.३०१/२०१८

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये अर्ज)**

**संस्थेचे नांव :**
**ज्ञानेश्वर प्रतिष्ठान, १६५, रेल्वे लाईन, सोलापूर**
नोंदणी क्र. : एफ-२९६४/सोलापुर.

श्रीमती सुनिता शरद पिशवीकर.
वय - ७४ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त,
रा. नाथ प्राईड बिल्डींग, सिव्हील हॉस्पिटल जवळ,
सोलापूर.

...अर्जदार

**विरुध्द**

कोणी नाही.

...सामनेवाला.

**(न्यायनिर्णय)**

**(जाहीर दिनांक १२/०२/२०१८)**

१. अर्जदार यांनी दिनांक २८/०१/२०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकाल संपलेल्या विश्वस्तांच्या जागी नविन विश्वस्तांची निवड झाल्याने झाल्याने प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत निशाणी क्र.०२ येथे नविन येणाऱ्या विश्वस्ताचे एकत्रित संमतीपत्र, निशाणी क्र.०३ येथे बाहेर पडणाऱ्या विश्वस्तांचे एकत्रित नाहरकतपत्र, निशाणी क्र.०५ येथे परिशिष्ट १ वरील विश्वस्तांचे एकत्रित नाहरकतपत्र, निशाणी क्र.०८ येथे दिनांक ०७/०१/२०१८ रोजीची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचनेची स्वसाक्षांकीत प्रत, निशाणी क्र.०९ येथे दिनांक २८/०१/२०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची स्वसाक्षांकीत प्रत, निशाणी क्र.१० येथे सभासद यादीची स्वसाक्षांकीत प्रत, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. बदल अहवाल बिगर वादाचा आहे असे असले तरी तो कायदेशीर आहे का? हे पाहणे गरजेचे आहे त्याकरीता माझेसमोर खालीलप्रमाणे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यांचे सकारण स्पष्टीकरण व निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जात नमुद केले प्रमाणे बदल झाला आहे का? व झालेला बदल कायदेशीर आहे का? | होय |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

Treasurer
Dnyaneshwar Pratishthan

Secretary
Dnyaneshwar Pratishthan

## कारणमिमांसा

३. वादप्रश्न क्र.१ करिता :- अर्जदार यांनी अर्जासोबत न्यासाची नियम नियमावली दाखल केलेली नाही याकरीता न्यासाचे या कार्यालयातील मुळ अभिलेख पडताळले असता असे दिसुन येते की, कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ०५ वर्षांचा राहिल तसेच कार्यकारी मंडळाची निवडणुक दर ०५ वर्षाने वार्षिक सर्वसाधारण सभेत होईल. तसेच परिशिष्ट क मधील परिच्छेद क्र.०८ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सभासदांची गणसंख्या पूर्ण होणेकरिता २/३ सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे. याकरीता निशाणी क्र.१० वरील सभासद यादीची स्वसाक्षांकीत प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, न्यासाचे एकुण १२ सभासद आहेत पैकी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना दिनांक ०७/०१/२०१८ रोजी सर्व सदस्यांना हस्तदेय मिळालेली आहे. निशाणी क्र.०९ वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ठराव क्र.०२ अन्वये कार्यकाल संपलेल्या विश्वस्तांच्या जागी नविन विश्वस्तांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे. प्रस्तुतचा अर्ज या कार्यालयातील अधिक्षक यांनी साक्षांकीत केला असल्याने अर्जदार यांचे स्वतंत्र पुराव्याचे शपथपत्र दाखल करणे आवश्यक नाही. अर्जदार यांनी दाखल केलेल्या मुळ कागदपत्रांच्या तसेच स्वसाक्षांकीत प्रतीच्या खरेपणाबाबत अर्जदार यांना व्यक्तिशः जवाबदार धरून प्रस्तुतचा बदल अर्ज स्विकारणे न्यासाचे हिताचे होईल अन्यथा भविष्यात न्यासाच्या व्यवस्थापनाबाबतचे उत्तरदायित्व ठरविणे कठीण होईल. कबुल तथ्यानुसार प्रस्तुतचा बदल बिगर वादाचा आहे. या तथ्यांचा एकत्रीत विचार करता अर्जात नमुद केले प्रमाणे बदल झाला आहे. झालेला बदल कायदेशीर आहे. या अनुमानास मी आलो आहे. त्यानुसार वादप्रश्न क्र.१ होकारार्थी उत्तरी करुन वादप्रश्न क्र.०२ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

Secretary
Dnyaneshwar Pratishthan

## आदेश

ASSISTANT COMMISSIONER SOLAPUR REGION

१. बदल अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. या आदेशाची नोंद परिशिष्ट-१ वर घेण्यात यावी.

12-2-18

(मा.स.बोराळे)
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
सोलापूर विभाग, सोलापूर

ASSISTANT CHARITY COMMISSIONER SOLAPUR REGION

दि. १२/०२/२०१८
स्थळ : सोलापूर

Principal
Suyash Central School
Solapur.

नक्कल तयार करणार.........
नक्कल जुळवत करणार.........

प्रमाणित सत्य प्रत
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर.

Treasurer
Dnyaneshwar Pratishthan